# मराठी (कुमारभारती) : बोर्डाची कृतिपत्रिका (मार्च 2021)

**वेळ : 3.00 तास]** **[एकूण गुण : 80**

**नोंद :** कोव्हिड-19 मुळे ही परीक्षा घेण्यात आली नाही.

# मराठी (कुमारभारती) : बोर्डाची कृतिपत्रिका (सप्टेंबर 2021)

## (आदर्श उत्तरांसह)

**वेळ : 3.00 तास]** **[एकूण गुण : 80**

***सूचना :*** *(1) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.*

*(2) आकृत्या पेनानेच काढाव्यात.*

*(3) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन) आकृती काढण्याची आवश्यकता नाही. तसेच त्या कृती लिहून घेऊ नयेत.*

*(4) विभाग 5 : उपयोजित लेखन–प्र. 5. (अ) (2) 'सारांशलेखन' या घटकासाठी गद्य विभागातील प्र. 1. (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.*

*(5) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.*

---

## विभाग 1 : गद्य

### पठित गद्य

**प्र. 1. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**


**(1) एका शब्दात उत्तर लिहा :** 2

(i) गावाचं वर्तमानपत्र – ------------------

(ii) वर्तमानपत्राची संपादक – ------------------

आमची ढाळज म्हणजे गावाचं वर्तमानपत्र होतं आणि आजी त्याची संपादक होती. तर सगळ्या बातम्या तिथं यायच्या. त्यांची शहानिशा व्हायची न् मग त्या गावभर जायच्या. कडुसं पडायच्या आधी ही मैफिल मोडायची. माणसांची वेळ झाली, की म्हातारीची ढाळज सुटायची. माणसं ढाळजंत बसायची. रात्री आठच्या दरम्यान ढाळजचा दरवाजा लागला आणि एकदा आतनं आगळ टाकली, की वाडा शांत व्हायचा. ही आगळ दरवाजाला लावणं किंवा ती काढणं म्हणजे आमच्यासाठी दिव्य असायचं. मुळात ही सहा फुटांची लांब आणि पाऊण फूट रुंद अशी सागवानी आगळ एका भिंतीतल्या देवळीत आरपार जायची. ती आरपार घालवून दरवाजा उघडणं किंवा तिच्या तोंडाला असणाऱ्या पितळी वाघाच्या जबड्यातील कडीला हात घालून ती बाहेर ओढणं व समोरच्या भिंतीतल्या देवळीत ढकलणं फार अवघड गणित होतं. ही आगळ म्हणजे दरवाजाचं, पर्यायाने वाड्याचं, भरभक्कम संरक्षक कवच होतं. दुपारीही एकदा आगळ टाकली की उन्हाचं, सुट्टीचं आम्हांला बाहेर पडायला संधी नसायची, तसाच रात्री त्या आगळीचा आधारही तितकाच वाटायचा.

**(2) आकृतिबंध पूर्ण करा :** 2



**(3) स्वमत :** 3

तुमच्या कुटुंबातील आजीचे महत्त्व स्वभाषेत लिहा.

**प्र. 1. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

**(1) कृती करा :** 2

अरुणिमाच्या मते असलेले भाकड शब्द →

जेमतेम ४० – ५० पावलांवरच माझा ऑक्सिजन साठा संपला... एक सांगू? लक, भाग्य, किस्मत, डेस्टिनी असल्या भाकड शब्दांना मी नाही मानत; पण Fortune favours the braves यावर माझा पूर्ण विश्वास आहे... जेव्हा मी गुदमरू लागले, श्वास घेण्याचा प्रयत्न करू लागले, अगदी त्याच वेळी एका ब्रिटिश माणसाने ओझे होते म्हणून फेकून दिलेला जास्तीचा एक ऑक्सिजन सिलिंडर आम्हांला दिसला. माझ्या शेरपाने तो चटकन मला अडकवला. सावकाश आम्ही त्या 'डेथ झोन'मधून सहीसलामत खाली उतरलो. वर चढण्यापेक्षा खाली उतरताना होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण जास्त आहे... आणि आम्ही ते ओलांडून आलो होतो. 'माझा दिवस' अखेर आला होता... गिर्यारोहकांच्या चढाईच्या टप्प्यातले एक महत्त्वाचे शिखर 'एव्हरेस्ट' मी सर केले होते!

गिर्यारोहणाने मला खूप महत्त्वाचे काही धडे दिले. माझ्यात आत्मविश्वास जागवला. नेतृत्व, गटबांधणी यांचे धडे तर मिळालेच; पण एक पोलादी कणखरपणा माझ्यात निर्माण केला. मित्रांनो, आपण आयुष्यात काय मिळवतो हे महत्त्वाचं नाही, तर ही कमाई आपल्याला अधिक चांगली व्यक्ती कशी बनवते, हे महत्त्वाचं वाटतं मला. आपण इतरांशी कसे वागतो यावरून आपण एक उत्तम व्यक्ती आहोत की नाहीत हे ठरतं.

**(2) सूचनेनुसार कृती सोडवा :**

**(i) चौकट पूर्ण करा :** 1

गिर्यारोहकांच्या चढाईच्या टप्प्यातले एक महत्त्वाचे शिखर – [ ]

**(ii) योग्य उत्तर लिहा :** 1

अरुणिमाच्या मते उत्तम व्यक्ती कशावरून ठरते ते लिहा.

**(3) स्वमत :** 3

पाठाच्या आधारे तुम्हांला समजलेले अरुणिमाचे गुणविशेष सविस्तर लिहा.

## अपठित गद्य

**प्र. 1. (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

**(1) चौकटी पूर्ण करा :** 2

(i) साहित्यिकाच्या व्यक्तिमत्त्वात बेमालूम भिनलेला अंश – [ ]

(ii) भाषेचे संकेत व वाङ्मयतंत्र यांचा कधीच गुलाम न बनणारा – [ ]

साहित्यिकाच्या व्यक्तिमत्त्वात सामाजिकतेचा अंश बेमालूम भिनलेला असतो. तसेच तो जी भाषा वापरतो ती त्याने सामाजिक व्यवहारातून आत्मसात केलेली असते. भाषेतील शब्द, वाक्प्रयोग, वाङ्मयीन संकेत यांची एक परंपरा त्याला वेढून असते, शिवाय वेगवेगळ्या वाङ्मयप्रकारांचे विशिष्ट तंत्रही तयार झालेले असते. या सर्वांचा हुकमी व परिणामकारकतेने उपयोग करायचा, तर पूर्वसुरींच्या साहित्याचे परिशीलन अत्यावश्यक असते. परंतु जातिवंत लेखक हा भाषेचे संकेत व वाङ्मयतंत्र यांचा कधीच गुलाम बनत नाही. शिवाय वाङ्मयाची परंपरा प्रवाही असते; विज्ञानाच्या परंपरेप्रमाणे ती एकमुखी व गणिती काटेकोरपणाची नसते. तिच्यात लेखकाच्या व्यक्तिविशेषांना भरपूर वाव असतो. नवनिर्मिती म्हटली तरी ती काही आकाशातून अचानक खाली येत नाही. तिचे काही धागे जुन्या व्यूहरचनेत गुंतलेले असतात.

**(2) चूक की बरोबर ते लिहा :** 2

(i) वाङ्मयाची परंपरा प्रवाही असते – ----------------

(ii) नवनिर्मितीचे धागे जुन्या व्यूहरचनेत गुंतलेले नसतात – ----------------

## विभाग 2 : पद्य

**प्र. 2. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

**(1) आकृती पूर्ण करा :** 2

← **वस्तूंजवळ माणसांसारख्या नसणाऱ्या गोष्टी** →

| | |
|---|---|
| वस्तूंना जीव नसेलही कदाचित, पण<br>जीव नसल्यासारखे वागवू नये त्यांना.<br>वस्तूंना मनही नसेल कदाचित, पण ते<br>असल्यासारखे वागलो तर वस्तू<br>प्रचंड सुखावतात.<br>वस्तू निखालस सेवकच असतात आपल्या,<br>तरीही बरोबरीचाच मान द्यावा त्यांना.<br>वस्तूंना वेगळी, स्वतंत्र खोली नको असते,<br>त्यांना फक्त 'आपल्या मानलेल्या' जागेवरून<br>निष्कासित न होण्याची हमी द्या. | वस्तूंनाही असते आवड स्वच्छ राहण्याची,<br>हे हातांना लक्षात ठेवायला सांगा.<br>वस्तूंना जपावे, लाडावूनही ठेवावे त्यापुढे जाऊन.<br>त्याच जिवंत ठेवणार आहेत आपला स्नेह<br>नंतरच्या काळातही.<br>आयुष्य संपले की वस्तूंनाही आजवरच्या<br>हक्काच्या घरात राहू देत नाहीत, तेव्हा<br>कृतज्ञतापूर्ण निरोपाचा त्यांचा हक्क<br>शाबूत ठेवावा. |

**(2) कारणे लिहा :** 2

(i) वस्तूंना जपावे आणि त्यांचे लाडही करावेत; कारण ------------------

(ii) वस्तूंना हक्काच्या घरात राहू दिले जात नाही; कारण ------------------

**(3) पुढील काव्यपंक्तींचा सरळ अर्थ तुमच्या शब्दांत लिहा :** 2

वस्तू निखालस सेवकच असतात आपल्या,
तरीही बरोबरीचाच मान द्यावा त्यांना.

(4) **काव्यसौंदर्य :**

● **पुढील काव्यपंक्तीतून व्यक्त होणारे अर्थसौंदर्य स्पष्ट करा :** 2

वस्तूंना वेगळी, स्वतंत्र खोली नको असते,
त्यांना फक्त 'आपल्या मानलेल्या' जागेवरून
निष्कासित न होण्याची हमी द्या.

**प्र. 2. (आ) पुढील मुद्द्यांच्या आधारे *कोणत्याही एका* कवितेसंबंधी पुढील कृती सोडवा :**

| मुद्दे | 'भरतवाक्य' किंवा 'खोद आणखी थोडेसे' | | |
|---|---|---|---|
| (i) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री – | | | 1 |
| (ii) कवितेचा विषय – | | | 1 |
| (iii) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे – | | | 2 |

**प्र. 2. (इ) रसग्रहण :**

● **पुढे दिलेल्या काव्यपंक्तींचे रसग्रहण करा :** 4

'तू झालास परिस्थितीवर स्वार
आणि घडवलास नवा इतिहास
तू झालास मूक समाजाचा नायक
आणि जागा केलास उभा बहिष्कृत भारत.'

## विभाग 3 : स्थूलवाचन

**प्र. 3. पुढीलपैकी *कोणत्याही दोन* कृती सोडवा :** 6

(1) गिरिजा कीर यांच्या बालनाटिकांचे विशेष लिहा.

(2) 'कठोर परिश्रमांमुळेच स्वाती महाडिक यांना स्वत:चा निर्धार पूर्ण करता आला', या विधानाबाबत तुमचे मत स्पष्ट करा.

(3) व्युत्पत्ती कोशाचे कार्य स्वभाषेत लिहा.

## विभाग 4 : भाषाभ्यास

**प्र. 4. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :**

**(1) समास :**

● **पुढील सामासिक शब्दांचा समास ओळखा :** 2

(i) आईवडील – (ii) पुरुषोत्तम –
(iii) पंचपाळे – (iv) त्रैलोक्य –

**(2) शब्दसिद्धी :**

● **पुढील तक्ता पूर्ण करा :** 2

भरदिवसा, खटपट, निकोप, टिकाऊ.

| उपसर्गघटित शब्द | प्रत्ययघटित शब्द | अभ्यस्त शब्द |
|---|---|---|
| -------------------- | -------------------- | -------------------- |
| -------------------- | -------------------- | -------------------- |

**(3) वाक्प्रचार :**

- **पुढीलपैकी *कोणत्याही दोन* वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा :** **4**

(i) खस्ता खाणे

(ii) कंठस्नान घालणे

(iii) समरस होणे

(iv) याचना करणे.

**प्र. 4. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती :**

**(1) शब्दसंपत्ती :**

(1) **पुढील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :** **1**

(i) आदर × [------------------]

(ii) सुबोध × [------------------]

(2) **पुढील शब्दांचे वचन ओळखा :** **1**

(i) पुस्तके

(ii) नदी

(3) **पुढील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा :** **1**

(i) पसरवलेली खोटी बातमी – [------------------]

(ii) समाजाची सेवा करणारा – [------------------]

(4) **पुढील शब्दातील अक्षरांपासून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा :** **1**

बेजबाबदारपणा.

**(2) लेखननियमांनुसार लेखन :**

- **अचूक शब्द ओळखा : *(कोणतेही चार शब्द ओळखणे.)*** **2**

(i) दुरभिमान, दूरभिमान, दुरभीमान, दूरभीमान

(ii) आर्शीवाद, आर्शिवाद, आशीर्वाद, आशिर्वाद

(iii) प्रतिबींब, प्रतीबिंब, प्रतीबींब, प्रतिबिंब

(iv) शारिरीक, शारिरिक, शारीरिक, शारीरीक

(v) आत्मवीश्वास, आत्मविश्वास, अत्मवीश्वास, आत्माविश्वास

(vi) निर्सग, नीर्सग, निसर्ग, नीसर्ग.

**(3) विरामचिन्हे :**

- **पुढील विरामचिन्हे ओळखून त्यांची नावे लिहा :** **1**

(i) ! – [-----------------]

(ii) . – [-----------------]

**(4) पारिभाषिक शब्द :**

- **पुढील शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा :** **1**

(i) Exhibition – [-----------]

(ii) Index – [-----------]

## विभाग 5 : उपयोजित लेखन

**प्र. 5. (अ) पुढील कृती सोडवा :**

**(1) पत्रलेखन :** 6

● **पुढील निवेदन वाचा व त्याखालील *कोणतीही एक* कृती सोडवा :**

**स्वच्छ शहर ! सुंदर शहर !**

***: शहर स्वच्छता मोहीम :***

'सांगली महानगरपालिका' यांच्या वतीने
संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त
शहर स्वच्छता मोहीम सप्ताह
दिनांक 23 फेब्रुवारी ते 1 मार्च

**: उद्घाटक :**

मा. आयुक्त, सांगली

**स्थळ –** यशवंत सभागृह, महानगरपालिका आवार, सांगली.

**दिनांक :** 23 फेब्रुवारी
**वेळ :** सकाळी 10 वाजता

संपर्क – sangalicorporation@gmail.com

विजय / विजया जगताप

**जनता वसाहत, सांगली**

सामाजिक कार्यकर्ता / कार्यकर्ती या नात्याने

| | | |
|---|---|---|
| 'शहर स्वच्छता मोहीम' या उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल मा. आयुक्तांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा. | ***किंवा*** | प्रभाग स्वच्छतेसाठी आवश्यक असणाऱ्या साहित्याची मागणी करणारे पत्र मा. आयुक्तांना लिहा. |

***किंवा***

**(2) सारांशलेखन :** 6

विभाग 1 : गद्य (इ) [प्रश्न क्र. 1 (इ)] मधील अपठित गद्य उताऱ्याचा एक-तृतीयांश सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र. 5. (आ) पुढीलपैकी *कोणत्याही दोन* कृती सोडवा :** **10**

**(1) जाहिरातलेखन :**

- **पुढील मुद्द्यांच्या आधारे शालेय गणवेशाच्या दुकानाची आकर्षक जाहिरात तयार करा :**

  सर्व शाळांचे गणवेश मिळण्याचे ठिकाण

  दर्जेदार कापड – उत्तम शिलाई

  सर्व साईजमध्ये उपलब्ध

  माफक दर

  प्रत्येक गणवेश खरेदीवर आकर्षक सवलत

**(2) बातमीलेखन :**

- 'न्यू इंग्लिश स्कूल, रत्नागिरी' या विद्यालयात 'वाचन प्रेरणा दिन' साजरा झाला. या समारंभाची बातमी तयार करा.

**(3) कथालेखन :**

- **अपूर्ण कथा पूर्ण करा :**

  हर्ष आणि हुसेन अगदी जिवलग मित्र होते. दिवाळीच्या सुट्टीसाठी हुसेन आईबरोबर मामाच्या गावाला गेला. आता सुट्टी संपेपर्यंत दोघे मित्र एकमेकांना भेटू शकणार नव्हते. एक दिवस सुट्टीतील अभ्यास करण्यासाठी हर्षने दप्तर काढले. त्याला हुसेनची आठवण येत होती आणि तेवढ्यात फोनची बेल वाजली .............

**प्र. 5. (इ) पुढील लेखनप्रकारांपैकी *कोणतीही एक* कृती सोडवा :** **8**


**(1) प्रसंगलेखन :**

ज्ञानदा माध्यमिक विद्यालय, अहमदनगर
– आयोजित –
इयत्ता 10 वीतील विद्यार्थ्यांसाठी
शुभेच्छा समारंभ
दि. 20 फेब्रुवारी वेळ : दुपारी 4.00
प्रमुख पाहुणे – मा. अजय कुलकर्णी
अध्यक्ष – मा. मुख्याध्यापक

- वरील समारंभप्रसंगी तुम्ही उपस्थित होता, अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.

**(2) आत्मकथन :**

- **पुढे दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे चौकटीतील घटकाचे आत्मकथन लिहा :**




**(3) वैचारिक लेखन :**

- 'प्रदूषण – समस्या व उपाय' या विषयावर तुमचे विचार लिहा.

# बोर्डाच्या कृतिपत्रिकेची उत्तरे (सप्टेंबर 2021)

**प्र. 1. (अ)**

**(1)** (i) ढाळज

(ii) आजी

**(2)** **आगळची वैशिष्ट्ये**

- सहा फूट लांब
- पाऊण फूट रुंद
- सागवानी
- देवळीत आरपार जाणारी

**(3)** माझी आजी स्वभावाने अगदी शालीन आहे. दुसऱ्यांच्या अडचणी समजून घेणे तिच्या वृत्तीत आहे. केवळ ती दुसऱ्यांच्या समस्या समजून घेत नाही, तर त्यांवर मात करण्यासाठी उपाय सुचवते. दुसऱ्यांच्या सुखदु:खाशी समरस होते. घरातल्या प्रत्येक व्यक्तीवर तिची माया आहे. माझे आई-बाबा दोघेही नोकरी करीत असल्यामुळे माझा अभ्यास घेणे, मला शाळेसाठी तयार करणे, मला हवे-नको ते पाहणे, माझी आवड-निवड सांभाळणे हे सर्व ती ममतेने करते. स्वभावाने ती जेवढी मृदू तेवढीच ती कणखर आहे. तिला अन्याय अजिबात सहन होत नाही. त्याविरुद्ध ती धडाडीने बोलते व कृती करते. त्यामुळे गावात तिला सगळे मान देतात. स्त्रियांचा बचत गट ती चालवते व विविध प्रकारची समाजसेवा करते. शुभ्र पांढऱ्या वस्त्रातील माझी आजी मला चालतीबोलती शारदामाय वाटते.

**प्र. 1. (आ)**

**(1)** अरुणिमाच्या मते असलेले भाकड शब्द

- लक
- भाग्य
- किस्मत
- डेस्टिनी

**(2)** (i) एव्हरेस्ट

(ii) आपण इतरांशी कसे वागतो, यावरून उत्तम व्यक्ती ठरते.

**(3)** अरुणिमाने केलेल्या आत्मकथनातून तिच्या व्यक्तिमत्त्वाची काही ठळक वैशिष्ट्ये दिसून येतात. वादळी आयुष्य तिच्या वाट्याला आले. चोरांनी तिच्या गळ्यातील साखळी खेचून तिच्यावर जीवघेणा हल्ला केला व धावत्या गाडीतून तिला फेकून दिले. तरीही या अपघातातून तिच्या दृढ व ठाम स्वभावामुळे ती वाचली. यातून तिची दुर्दम्य जीवनेच्छा दिसून येते. अपंग होऊनही या विफल परिस्थितीत ती डगमगली नाही. परावलंबी झाली नाही. तिच्याकडे कणखरपणा, जिद्द व अत्युच्च आत्मविश्वास होता. जबरदस्त धैर्य असल्यामुळे एक पाय कापलेला असतानाही अरुणिमाने एव्हरेस्ट शिखर सर केले व एव्हरेस्ट शिखर सर करणारी ती पहिली अपंग भारतीय महिला ठरली. सामान्यातून असामान्यत्व दर्शवणारी अरुणिमा ही एक आदर्श स्त्री ठरली आहे. तिच्या जिद्दीची ही कहाणी अद्भुत व रोमांचकारी आहे.

प्र. 1. (इ)

(1) (i) सामाजिकता

(ii) जातिवंत लेखक

(2) (i) बरोबर (ii) चूक

प्र. 2. (अ)

(1) जीव ← **वस्तूंजवळ माणसांसारख्या नसणाऱ्या गोष्टी** → मन

(2) (i) नंतरच्या काळातही त्या आपला स्नेह जिवंत ठेवणार आहेत.

(ii) त्यांचे आयुष्य संपते.

(3) वस्तूंविषयी सहभाव दाखवताना कवी म्हणतात – वस्तू खरे तर आपली चाकरी करतात. त्या आपल्या सेवक असतात; तरीही आपण त्यांचा सन्मान राखायला हवा. त्यांना बरोबरीच्या नात्याने वागवावे.

(4) कवी द. भा. धामणस्कर यांनी 'वस्तू' या कवितेमध्ये घरातील वस्तूंवर मानवी भावनांचे आरोपण केले आहे. या ओळींमधून वस्तूच्या मनातील आर्त भाव प्रकट झाले आहेत.

खरे हे आहे की वस्तू माणसांची सेवा करतात. म्हणून त्यांना आपुलकीने वागवायला हवे. त्यांना समान दर्जा द्यावा. त्यांना दुःख देऊ नये. त्यांना आपल्याबरोबर स्नेहाने राहायचे असते. फक्त वस्तूंना नेमलेल्या व त्यांनी आपल्या मानलेल्या जागेवर राहू द्यावे. त्यांना स्वतंत्र खोली नको असते. परंतु त्यांना त्यांच्या जागेवरून न हलवण्याचे आश्वासन द्या, असे कवी कळकळीने सांगत आहे.

प्र. 2. (आ)

(1) **भरतवाक्य :**

(i) **प्रस्तुत कवितेचे कवी :** मोरोपंत.

(ii) **प्रस्तुत कवितेचा विषय :** सज्जन माणसाचे महत्त्व.

(iii) **प्रस्तुत कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे :** ही कविता मला आवडते. कारण लहानपणापासून मी ती ऐकत आलो आहे. लहानपणी ती पाठही केली होती. आता मोठा झाल्यावर कवितेचा अर्थ कळला आहे. कवितेत चांगले वागण्याचा सल्ला दिला आहे. पण चांगले म्हणजे काय, हे सोप्या पद्धतीने सांगितले आहे. सज्जन माणूस जसे वागतो, बोलतो, विचार करतो, तसे म्हणजे चांगले, इतकी सोपी कल्पना वापरून आपले म्हणणे सांगितले आहे. पण या कवितेतील संस्कृतप्रचुर शब्दांमुळे अर्थ कळण्यात अडचणी येतात. ही एक कवितेविषयी नावड निर्माण करणारी बाब आहे.

(2) **खोद आणखी थोडेसे :**

(i) **प्रस्तुत कवितेच्या कवयित्री :** आसावरी काकडे.

(ii) **प्रस्तुत कवितेचा विषय :** प्रयत्न व सकारात्मकता यांचे महत्त्व.

(iii) **प्रस्तुत कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे :** ही कविता मला खूप खूप आवडली आहे. ही कविता वाचता वाचता मनातील निराशेचे मळभ दूर होते. प्रयत्न करीत राहण्यातच यशाचा मार्ग आहे, हे मनोमन पटते. थोड्याशा प्रयत्नाने, थोड्याशा बळानेही उमेद निर्माण होते. या शब्दांनी मनाला उभारी येते. ही कविता माणसाला चांगले जीवन जगण्याची प्रेरणा देते.

**प्र. 2. (इ) आशयसौंदर्य :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शोषित व पीडित जनतेवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढा उभारला. मूकसमाजाच्या या महानायकाला अभिवादन करताना ज. वि. पवार यांनी 'तू झालास मूक समाजाचा नायक' या कवितेमध्ये त्यांच्या महत्कार्याचा गौरव करताना उपरोक्त ओळी लिहिल्या आहेत.

**काव्यसौंदर्य :** चवदार तळ्याच्या संग्रामाला पन्नास वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कर्तृत्वाची थोरवी गाताना कवी म्हणतो—प्रतिकूल परिस्थितीवर मात करून तुम्ही या वर्णव्यवस्थेने ग्रासलेल्या समाजाला जागृत केलेत. त्यांना नवविचारांची प्रेरणा देऊन नवीन इतिहास घडवलात. अन्याय सहन करणाऱ्या जनतेचे तुम्ही महानायक झालात. बहिष्कृत असलेल्या पीडित समाजात नवचैतन्य निर्माण केलेत. त्यांच्यातील आत्मविश्वास जागवलात.

**भाषिक वैशिष्ट्ये :** मुक्तशैलीमध्ये लिहिलेली ही कविता त्यातील समर्पक शब्दांमुळे अर्थवाहक झाली आहे. 'मूक समाज', 'बहिष्कृत भारत' या संकल्पनांचा यथोचित वापर केल्यामुळे कविता परिणामकारक झाली आहे. सुयोग्य व ठाशीव शब्दकळा हे या कवितेचे बलस्थान आहे. थेट शब्दकळेमुळे ओज हा गुण दिसून येतो. आशयाला समर्पक अभिव्यक्तीची जोड मिळाल्यामुळे ओळी रसिकांच्या काळजाला भिडतात.

**प्र. 3.**

**(1)** गिरिजाबाईंनी बालकांसाठीसुद्धा लक्षणीय साहित्यनिर्मिती केली. बालकांचे वय लक्षात घेऊन त्यांनी साध्या, सोप्या बालनाटिकाही लिहिल्या. साधारणपणे लहान मुलांना अद्भुतरम्य व चमत्कारावर आधारित कथानके आवडतात, असा समज असतो. गिरिजाबाईंनी या समजाला छेद दिला. त्यांनी वास्तवावर आधारित बालनाटिका लिहिल्या. मुलांचे भावविश्व व त्यांच्या गरजा यांना प्राधान्य देऊन बालनाटिका लिहिल्या. त्यांच्या बालनाटिकांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांची चित्रदर्शी शैली. त्यांच्या नाटिकांमधला प्रसंग समोर जिवंतपणे घडत आहे, असे वाटत राहते. त्यामुळे त्यांच्या बालनाटिका पाहताना प्रेक्षक खिळून बसतात. एकंदरीत त्यांच्या बालनाटिका वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

**(2)** पतिनिधनामुळे स्वाती आधीच दुःखाच्या खाईत लोटल्या गेल्या होत्या. त्यातच दोन मुलांना वाढवण्याची जबाबदारीही त्यांच्यावरच येऊन पडली होती.

दुसरी एक गोष्ट स्वातींच्या मार्गात आडवी येणारी होती. आता स्वाती वयाच्या चाळिशीत पोहोचल्या होत्या. या वयात धडाकेबाज कृती करण्यास लागणारे शारीरिक-मानसिक बळ कमी असण्याचा संभव असतो. तसेच, त्यांनी सैन्यात जाण्याचा निर्णय घेतला होता. तेथे कमालीची शारीरिक क्षमता आवश्यक असते आणि शारीरिक क्षमतेपेक्षा मानसिक बळ अधिक गरजेचे असते.

या अडचणी दूर करण्यासाठी अफाट कष्ट घ्यावे लागणार होते. परंतु कोणत्याही परिस्थितीत सैन्यात जायचेच, असा स्वाती यांचा पक्का निर्धार होता. त्यासाठी वाट्टेल ते कष्ट घेण्याची मानसिक तयारी त्यांनी केलेली होती. तसे कष्ट त्यांनी घेतलेसुद्धा. म्हणूनच त्यांना स्वतःचा निर्धार पूर्ण करता आला.

**(3) व्युत्पत्ती कोशाचे कार्य :** व्युत्पत्ती म्हणजे एखाद्या शब्दाच्या किंवा अर्थाच्या मुळाचे ज्ञान होय. व्युत्पत्ती सांगणे म्हणजे एखाद्या शब्दाच्या मुळाविषयी माहिती देणे होय. अशा अनेक शब्दांच्या व्युत्पत्तींचा संग्रह म्हणजे व्युत्पत्ती कोश !

व्युत्पत्ती कोशाचे कार्य पुढीलप्रमाणे चार प्रकारे चालते :

(१) मराठी भाषेतील – प्रमाण व बोली – शब्दांचे मूळ रूप दाखवणे.

(२) विशिष्ट प्रदेशात व भौगोलिक परिसरात एकाच शब्दातील उच्चारांत बदल होत असतो. हा शब्दाच्या उच्चारांतील बदल व फरक दाखवणे.

(३) भाषेमध्ये इतिहासाच्या दृष्टीने फरक होत असतात. भिन्न भिन्न काळात जे शब्दांत बदल होतात, त्या बदलांचे कारण स्पष्ट करणे.

(४) भिन्न भिन्न समाजांत वेगवेगळ्या कारणांनी शब्दाच्या अर्थांच्या अंगानेही बदल संभवतात. हे अर्थांतील बदल स्पष्ट करणे.

**प्र. 4. (अ)**

**(1)** (i) आईवडील – इतरेतर द्वंद्व

(ii) पुरुषोत्तम – कर्मधारय

(iii) पंचपाळे – द्विगू

(iv) त्रैलोक्य – द्विगू

**(2)**

| उपसर्गघटित शब्द | प्रत्ययघटित शब्द | अभ्यस्त शब्द |
|---|---|---|
| भरदिवसा<br>निकोप | टिकाऊ | खटपट |

**(3)** (i) खस्ता खाणे – **अर्थ :** खूप कष्ट उपसणे.

**वाक्य :** रमाबाईंनी समीरच्या शिक्षणासाठी आयुष्यभर खस्ता खाल्ल्या.

(ii) कंठस्नान घालणे – **अर्थ :** ठार मारणे.

**वाक्य :** भारतीय जवानांनी सीमेवर शत्रूच्या सैनिकांना कंठस्नान घातले.

(iii) समरस होणे – **अर्थ :** एकरूप होणे.

**वाक्य :** विठूनामाच्या गजरात समस्त वारकरी समरस होऊन गात होते.

(iv) याचना करणे – **अर्थ :** विनवणी करणे.

**वाक्य :** अंदमानच्या तुरुंगात स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अतोनात छळ करण्यात आला, तरीदेखील त्यांनी सुटकेसाठी कोणाकडेही याचना केली नाही.

**प्र. 4. (आ)**

**(1)** (1) (i) आदर × अनादर

(ii) सुबोध × दुर्बोध

(2) (i) पुस्तके – अनेकवचन

(ii) नदी – एकवचन

(3) (i) पसरवलेली खोटी बातमी – अफवा

(ii) समाजाची सेवा करणारा – समाजसेवक

(4) बेजबाबदारपणा : जर बाणा

**(2)** (i) दुरभिमान

(ii) आशीर्वाद

(iii) प्रतिबिंब

(iv) शारीरिक

(v) आत्मविश्वास

(vi) निसर्ग.

**(3)** (i) ! – उद्गारचिन्ह (ii) . – पूर्णविराम

**(4)** (i) Exhibition – प्रदर्शन (ii) Index – अनुक्रमणिका

**प्र. 5. (अ), (आ) व (इ)...**

**उपयोजित लेखनातील कृतींच्या स्वयं-मूल्यमापनाबाबत...**

उपयोजित लेखनाच्या कृतींमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तरे लिहिताना स्वत:चे विचार, स्वत:च्या कल्पना स्वभाषेत लिहाव्यात, अशी अपेक्षा आहे. या कृतींची उत्तरे मुक्तोत्तरी स्वरूपाची असतात. विद्यार्थ्यांनी यांची उत्तरे स्वत: लिहावीत.

या विषयातील सोडवून दिलेल्या पहिल्या कृतिपत्रिकेतील उपयोजित लेखनामधील कृतींची उत्तरे विद्यार्थ्यांनी अभ्यासावीत; गुणदानपद्धतीतील मुद्दे विचारात घ्यावेत आणि स्वत: लिहिलेले उत्तर स्वत:च तपासण्याचा प्रयत्न करावा. गरजेनुसार आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शनही घ्यावे.

उपयोजित लेखनाच्या अधिक अभ्यासासाठी **'नवनीत मराठी प्रथम भाषा उपयोजित लेखन : इयत्ता दहावी'** या पुस्तकात दिलेले उपयोजित लेखनाचे नमुने अवश्य वाचावेत.

❊ ❊ ❊